स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



यशस्वी २१ वर्ष

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● शनिवार, दिनांक 23 मे २०२६ ● वर्ष २१वे ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये


# देवा तु सांगना, कुठं गेला हरवूनी लेकराची आन तुला, अवतार आता तरी...!!

## ब्रेन ट्यूमरची सर्जरी झालेल्या पत्नीला बरे करण्यासाठी ऊसतोड मजुराचा टोकाचा संघर्ष हृदय पिळवटून टाकणारा!!

- एका ऊसतोड मजुराची पत्नी असलेल्या अवघ्या 29 वर्ष वयाच्या शितल बांगर यांच्यावर नवी मुंबई टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये ट्रेडिशन थेरपी सुरू!!
- ब्रेन ट्यूमरची सर्जरी होऊन महिना झाला, आता त्यांच्यावर रेडिएशन थेरपी चालू असून त्यासाठी साडेपाच ते सहा लाख रुपये खर्च येण्याची अपेक्षा!!
- चिमुकल्यांना आई होईल, वृद्ध आजीला सून आणि ज्या पत्नीसाठी सर्वस्व पणाला लावले त्या पतीचा संसार होईल, तेव्हा दानशुरांनो तो एक जीव वाचवण्यासाठी सहकार्य करा!!

### महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आर्थिक मदतीचे आवाहन केले तर नक्कीच दोन चिमुकल्यांच्या आईचा जीव वाचेल!!

**बीड : प्रतिनिधी**
शिरूर कासार तालुक्यातील खोकरमोहा येथून जवळच असलेल्या घुगेवाडी येथील एक छोटा ऊसतोड मजूर असलेल्या सोमीनाथ देवराव घुगे यांच्या घरी अठरा विश्व दारिद्र्य, त्यातच त्यांच्या पत्नी शितल बांगर-घुगे यांच्यावर नुकतीच ब्रेन ट्युमरची शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेमुळे घुगे यांच्या कुटुंबावर आभाळा एवढं संकट कोसळलं आहे. अशाही बिकट परिस्थितीमध्ये सोमीनाथ घुगे यांनी पत्नीला या धुरंदर आजारातून बरे करण्यासाठी सर्वस्व पणाला लावले आहे. चिमुकल्यांचे छत्र हरवू नये आणि पत्नी शितल सुखरूप या आजारातून बाहेर पडावी म्हणून सोमीनाथ घुगेंचा जो संघर्ष सुरू आहे, तो खरोखरच हृदय पिळवटून टाकणारा आहे. आभाळा एवढं संकट घेऊन न थकता नव्या मुंबईतील अनोळख्या गर्दीत धावत सुटत आणि मोठ्या आकांताने पत्नीचा जीव वाचवण्यासाठी सोमीनाथ घुगे यांचा जीवघेणा संघर्ष पाहून असे वाटते की, देवा तू जिथे कुठे असशील तिथे असशील पण ऊसतोड मजुराच्या या हतबल झालेल्या कुटुंबासोबत एवढं क्रूरतेनं आणि निष्ठुरपणे वागू नकोस!!



**महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आर्थिक मदतीचे आवाहन केले तर नक्कीच दोन चिमुकल्यांच्या आईचा जीव वाचेल!!**

● मागील एक महिन्यांपासून शितल बांगर-घुगे यांच्या ब्रेन ट्यूमरची शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यांना लागणारा पुढील खर्च एका ऊसतोड मजुराला न झेपणारा आहे. परंतु, अशाही बिकट परिस्थितीमध्ये ऊसतोड मजूर असलेल्या सोमीनाथ घुगे यांनी हार न मानता शितल बांगर-घुगे यांच्यावर नवी मुंबई येथील टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू ठेवले आहेत. तेव्हा घुगे परिवाराच्या अशा बिकट परिस्थितीत महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी जर शितल बांगर-घुगे यांच्या उपचारासाठी आर्थिक मदत करण्यासाठी आवाहन केले तर नक्कीच त्यांना जीवदान मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

**महिन्यापूर्वी झाली ब्रेन ट्यूमरची शस्त्रक्रिया आणि आता सुरू आहे रेडिएशन थेरपी!**






शीतल बांगर-घुगे यांच्यावर ब्रेन ट्युमरची शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर आता नवी मुंबई खारघर येथील टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये रेडिएशन थेरपी चालू आहे. ब्रेन ट्युमरच्या शस्त्रक्रियेसाठी जवळपास अडीच ते तीन लाख रुपये खर्च आला. आणि आता रेडिएशन थेरपीसाठी अंदाजे जवळपास साडेपाच ते सहा लाख रुपये खर्च येवू शकतो, असे सोमीनाथ घुगे यांनी दैनिक 'वास्तव'शी बोलताना सांगितले. दानशुरांनी माझ्या पत्नीच्या उपचारासाठी आर्थिक मदत केली तर नक्कीच माझ्या चिमुकल्यांवरील छत्र कायम राहील. त्याशिवाय माझ्या पत्नीचे प्राण वाचतील. एका ऊसतोड मजुराचा संसार सुखाचा होईल, अशी भावनिक साद सोमीनाथ घुगे यांनी यावेळी घातली. घुगे यांनी घातलेली ही भावनिक साद अक्षरशः हृदय पिळवटून टाकणारी आहे.

**दानशूरांनो मानवतेच्या दृष्टिकोनातून तुम्ही या ठिकाणी मदत करू शकता!**

शितल मारोती बांगर-घुगे यांचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेत अकाउंट असून त्याचा **A/c no. 80057992355** **IFSC** code MAHG0004536 तसेच त्यांचा **फोन पे नंबर 9021044642** हा आहे. तेव्हा मानवतेच्या दृष्टिकोनातून फुल न फुलाची पाकळी किंवा खारीचा वाटा समजून माझी पत्नी पटकन या आजारातून बरी व्हावी यासाठी आर्थिक सहकार्य करा, असे भावनिक आवाहन ऊसतोड मजूर सोमनाथ घुगे यांनी केले आहे.

## आडत मार्केटमधील अतिक्रमणांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?; व्यापाऱ्यांनी भिंती फोडून पत्राशेड उभारल्याचा आरोप





● आडत मार्केटमध्ये नगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण झाल्याचा आरोप. ● भिंती फोडून अनधिकृत पत्राशेड उभारल्याचा दावा. ● नोटीस बजावूनही कारवाई न झाल्याचा आरोप. ● भाजी मंडईतील लहान व्यावसायिकांवर कारवाई, मात्र मोठ्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका. ● अतिक्रमणधारकांना राजकीय पाठबळ असल्याची चर्चा.

**बीड / प्रतिनिधी :**
बीड शहरातील आडत मार्केट परिसरात काही व्यापाऱ्यांनी नगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर भिंती फोडून अनधिकृत पत्राशेड उभारल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. भाजी मंडईतील लहान व्यावसायिकांवर अतिक्रमणाच्या नावाखाली कारवाई करणारे नगरपरिषद प्रशासन आडत मार्केटमधील कथित अतिक्रमणांकडे मात्र दुर्लक्ष करत असल्याची टीका त्यांनी केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे की, नगरपालिकेने भाडे तत्त्वावर दिलेल्या गाळ्यांलगत काही व्यापाऱ्यांनी नगरपालिकेच्या भिंती तोडून त्या ठिकाणी बेकायदेशीर पत्राशेड उभारले आहेत. यामुळे नगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान झाले असून सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. भाजी व फळ विक्रेत्यांवर कठोर कारवाई करणाऱ्या प्रशासनाला आडत मार्केटमधील हे अतिक्रमण दिसत नाही का, असा सवाल उपस्थित करत त्यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्यावरही निशाणा साधला.

**नोटीसनंतरही कारवाई नाही?:**
डॉ. ढवळे यांच्या म्हणण्यानुसार, नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव यांनी ७ एप्रिल २०२६ रोजी संबंधित सहा व्यापाऱ्यांना चार दिवसांच्या आत अतिक्रमण हटविण्याच्या नोटिसा बजावल्या होत्या.
नोटीसमध्ये अन्यथा कारवाईचा इशाराही देण्यात आला होता. मात्र, महिनाभराहून अधिक कालावधी उलटूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

काही व्यापाऱ्यांना राजकीय पाठबळ असल्यामुळेच कारवाई होत नसल्याची चर्चा परिसरात सुरू असल्याचेही डॉ. ढवळे यांनी पत्रकात नमूद केले आहे. संबंधित अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करून नगरपालिकेची जागा अतिक्रमणमुक्त करावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## पैठण तालुक्यातील बहुतांश पेट्रोल पंपावर रात्री उशिरापर्यंत तोबा गर्दी

**पैठण / सर्जेराव खडसन**
आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता ग्रामीण भागापर्यंत पोहोचला असून त्याचा थेट परिणाम इंधन पुरवठ्यावर झाल्याने पैठण तालुक्यात सध्या इंधन टंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. पेट्रोल व डिझेलच्या कमतरतेमुळे वाहनधारक नागरिक पुरते हैराण झाले आहेत. तालुक्यातील बहुतांशी पेट्रोल पंप अचानक चालू होऊन अचानक बंद होत असल्याने वाहनधारकांची तारांबळ उडून त्यांच्यामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. तर काही ठिकाणी इंधन मिळवण्यासाठी पंपावरील कामगार आणि वाहनधारकांमधे वाद होण्याचे प्रकार घडत आहे.
पैठण शहरातील ३ तसेच पैठण ते छत्रपती संभाजीनगर मुख्य रस्त्यावरील पिंपळवाडी पी येथील २, ईसारवाडी १, ढोरकिन १ यासह आपेगाव, नायगाव, पाटेगाव, बालानगर, बिडकीन, लोहगावसह तालुक्यातील इतर ठिकाणच्या पेट्रोल पंपावर इंधनाचे टँकर आल्यानंतर इंधन वितरण केले जात असले



तरी तो आलेला इंधन साठा काही वेळातच संपून सदर पंपावर अचानक "नो स्टॉक"चे फलक झळकत असल्याने याठिकाणी मोठी गर्दी होऊन वाहनांच्या दूरवर लांबलचक रांगा लागत आहे. काही ठिकाणी तर पंप चालक व वाहनधारकांमधे वाद निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे दरम्यान, खरीप हंगामाच्या पूर्व तयारीला आता वेग आला असल्याने शेतकऱ्यांना शेत मशागत करण्याच्या कामी येणाऱ्या ट्रॅक्टर मधे डिझेल टाकण्यासाठी कित्येक तास रांगेत उभे राहावे लागत आहे.

तरीही इंधन मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच दैनंदिन कामासाठी वापरण्यात येणारी दुचाकी, चार चाकी वाहनधारक आपल्याला आता तरी इंधन मिळेल या आशेने पंपावर कित्येक तास रांगा लाऊन उभी असल्याचे चित्र दिसत आहे. त्यातच तालुक्यातील बहुतांश पेट्रोल पंप कधी ही सुरू होऊन पेट्रोल, डिझेलच्या कमतरतेमुळे अचानक बंद पडत असल्याने वाहनधारक नागरिक पुरते हैराण झाले आहेत. या गंभीर परिस्थितीकडे पुरवठा विभागाने तातडीने लक्ष देऊन इंधनाचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिक, वाहनधारक आणि शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# शेर-ए-पंजाब मौलाना उस्मान लुधियानवी यांचा चिखलीत ऐक्याचा संदेश

## "आई-वडिलांची सेवा करा, गरिबांना मदत करा, नावासाठी नव्हे तर कामातून ओळख निर्माण करा"- शेर-ए-पंजाब मौलाना उस्मान लुधियानवी





आष्टी / प्रतिनिधी : आई-वडिलांची सेवा करा. समाजसेवा किंवा प्रतिनिधित्व करायचे असेल तर गरिबांना प्रथम प्राधान्य द्या. नावासाठी नव्हे तर आपल्या कामातून ओळख निर्माण व्हावी अशीच मदत करा. कुराण हा ग्रंथ सर्वांसाठी आहे. सर्व जाती-धर्माच्या लोकांनी तो एकदा अवश्य वाचावा. जाती-धर्माच्या भिंती पाडून टाका, आप आपसातील भांडणं थांबवा, स्वत:ला हिम्मतवान समजत असाल तर गोर गरिबांना त्रास देऊ नका" असे प्रतिपादन पंजाब राज्याचे शाही इमाम मौलाना उस्मानसाहेब लुधियानवी यांनी मंगळवार दि. १९ रोजी आष्टी तालुक्यातील चिखली येथे आयोजित कार्यक्रमात केले. मौलाना उस्मानसाहेब लुधियानवी यांचे आष्टीत आगमन होताच सर्व धर्मियांच्या वतीने त्यांचे ठीक ठिकाणी स्वागत करून त्यांच्यावर जेसीबीद्वारे फुलांची उधळण करण्यात आली.

आष्टी तालुक्यातील चिखली येथे मायनॉरिटी सोशल डेव्हलपमेंट बोर्डांतर्गत कार्यरत असलेल्या जामीया अबुल हसन संस्थेद्वारा २०२२ पासून शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरू आहे. येथे विद्यार्थ्यांना उर्दू, अरबी शिक्षण, संगणक शास्त्र तसेच शालेय शिक्षण दिले जाते. तसेच नैतिक मूल्ये, संस्कार व देशभक्तीची भावना रुजविण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते त्यांच्या संस्थेची माहिती घेऊन पाहणी करून समाधान व्यक्त केले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मौलाना लुधियानवी यांनी अतिशय महत्त्वाचे संदेश दिले.


या कार्यक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे चोख नियोजन करण्यात आले होते. यावेळी मुफ्ती शफिक साहेब मिल्ली, माजी आमदार साहेबराव दरेकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, देविदास धस, गणेश शिंदे, जि.प. सदस्य सतीश शिंदे, सभापती रमजान तांबोळी, काकासाहेब शिंदे, पत्रकार बबलू सय्यद, अण्णासाहेब साबळे, प्रा निसार शेख, कासम शेख, मुजाहिद सय्यद, जावेद पठाण, शिवरायांचा मावळा समीर शेख, तसेच परिसरातील नागरिक व सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत एकाच वर्षी ८० विद्यार्थी पात्र होणारी बावीची स्वामी विवेकानंद विद्यालय एकमेव शाळा

**आष्टी / प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत एकाच वर्षी ८० विद्यार्थी पात्र होणारी स्वामी विवेकानंद विद्यालय, बावी ही एकमेव शाळा ठरली आहे. या शाळेच्या माध्यमातून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा आलेख दरवर्षी उंचावत आहे. विविध राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांमध्ये या शाळेचे आतापर्यंत २०० पेक्षा जास्त विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त झाले आहेत. तर जवाहर नवोदय परीक्षेत शाळेचे ०४ विद्यार्थी नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

स्वामी विवेकानंद विद्यालय ग्रामीण भागात असूनही शहरातील दर्जेदार शाळेसारखी गुणवत्ता विद्यार्थ्यांना प्रदान करीत आहे. वर्षभर शाळेत विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रयोग आणि शालेय अभ्यासक्रम अतिशय प्रभावीपणे पूर्ण करून विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते.

यावर्षी इयत्ता ५ वी मधून ३१ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. ते पुढीलप्रमाणे : १) ढोबळे श्रुतिका ज्ञानेश्वर २)




गोल्हार सिद्धी वैभव ३) मोरे श्रेयश चांगदेव ४) गर्जे सार्थक एकनाथ ५) घुगे दत्तात्रय परमेश्वर ६) गर्जे स्वानंदी संदीप ७) बडे ऋतुजा भिमराव ८) लटपटे संस्कार मच्छिंद्र ९) गोल्हार श्रेयश ज्ञानेश्वर १०) आघाव यश भागवत ११) चौधरी आदित्य आत्माराम १२) बळे कार्तिक महादेव १३) गर्जे प्रथमेश दादासाहेब १४) शेंडे प्रतिक नागनाथ १५) शेख साद समीर १६) गोरे आयुष मल्हारी १७) फुलमाळी यश बाबासाहेब १८) तरटे सिद्धेश अनिल १९) गाढवे तन्वी संदीप २०) गर्जे सुदर्शन रामभाऊ २१) घुगे शिवम परमेश्वर २२) वनवे आरोही अरुण २३) रोमन कल्याणी आजिनाथ २४) महाजन संग्राम संतोष २५) घुगे अथर्व पांडुरंग २६) लोखंडे अभिमन्यू महादेव २७) गर्जे प्रगती खंडू २८) गर्जे श्रेय संतोष २९) ढोबळे यशस्वी योगेश ३०) महाजन ऋषिकेश बाळू ३१) गोल्हार सिद्धार्थ सुनील इयत्ता ८ वी मधून ०८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. ते पुढीलप्रमाणे (गुणांसह) : १) समाधान अण्णासाहेब कावळे – ३०० पैकी २६६ गुण २) समृध्दी मल्हार आंधळे – ३०० पैकी २५० गुण ३) प्रतिक्षा एकनाथ गोल्हार – ३०० पैकी २२२ गुण ४) सत्यजित बाळासाहेब भवर – ३०० पैकी १९४गुण ५) आर्या बारीकराव थोरवे – ३०० पैकी १९४ गुण ६) अंकित अशोक गर्जे – ३०० पैकी १८८ गुण ७) सम्यक शेषराव घुगे – ३०० पैकी १७० गुण ८) ओंकार राजू शिंदे – ३०० पैकी १६६ गुण तसेच इयत्ता ४ थी व ७ वी मधील ४१ विद्यार्थी पात्र होणार असल्याने, २०२६ च्या शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ८० विद्यार्थी पात्र होणारी ही ग्रामीण भागातील तालुक्यातील उत्कृष्ट शाळा ठरली आहे. शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. सर्व शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षक यांच्या स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

# विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान के.डी. राऊत सर यांना पद्मपाणी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त!




बीड / प्रतिनिधी : बीड तालुक्यातील नाळवंडी येथील रहिवासी तथा वाहेगाव आमला येथील श्रीहरी विद्यालय या ठिकाणी मुख्याध्यापक पदावर रुजू असलेले के.डी. राऊत सर यांना काल बीड शहरातील नाट्यगृह याठिकाणी पद्मपाणि आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी या पुरस्काराचे वितरण AHTU प्रभारी पल्लवी जाधव यांच्यासह नाशिक ग्रामीण या ठिकाणी पोलीस निरीक्षक म्हणून नूतन नियुक्त झालेले सुभाष सानप यांच्या हस्ते वितरित करण्यात आले होते यावेळी के.डी. राऊत सर यांचे कुटुंब उपस्थित होते. के.डी राऊत सर यांची ओळख पूर्वीपासूनच शैक्षणिक क्षेत्रामध्ये एका विशिष्ट उंची वरती राहिलेली आहे तर त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजवर खेडेगावातील अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये घवघवीत असे यश संपादित केलेले असून खऱ्या अर्थाने हा सन्मान योग्य व्यक्तीला मिळाल्याने या पुरस्काराची आणखी उंची वाढलेली आहे तर काल हा पुरस्कार AHTU च्या प्रभारी पल्लवी जाधव यांच्यासह नाशिक नूतन ग्रामीण पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता यावेळी हा पुरस्कार स्वीकारताना के.डी राऊत सर यांच्यासह त्यांचे कुटुंब उपस्थित होते.

# एआय चा दणका 2026 : मेटामध्ये मोठी कर्मचारी कपात; तब्बल ८,००० कर्मचाऱ्यांची नोकरी गेली!

मुंबई : तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठी कंपनी असलेल्या 'मेटा'ने पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात करत तब्बल ८,००० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. ही संख्या कंपनीच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या जवळपास १० टक्के इतकी असल्याचं सांगितलं जात आहे. विशेष म्हणजे, ही कारवाई अत्यंत गुप्त आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली. कर्मचाऱ्यांना आधी घरातून काम (Work From Home) करण्याच्या सूचना देण्यात आल्या आणि त्यानंतर पहाटे ई-मेल पाठवून त्यांना नोकरीवरून कमी करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

पहाटे आलेल्या ई-मेलमुळे अनेक कर्मचाऱ्यांना मोठा धक्का बसला. सिंगापूरमधील कर्मचाऱ्यांना पहाटे ४ वाजता, तर भारतीय वेळेनुसार पहाटे १:३० वाजता कंपनीकडून ई-मेल पाठवण्यात



आले. या ई-मेलमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांची सेवा तत्काळ समाप्त करण्यात आल्याचं नमूद करण्यात आलं होतं. कार्यालयात गोंधळ, नाराजी किंवा आंदोलन होऊ नये यासाठी कंपनीनं कर्मचाऱ्यांना ऑफिसमध्ये न बोलावता घरातूनच काम करण्यास सांगितल्याची माहिती समोर आली आहे. या कर्मचारी कपातीमागचं प्रमुख कारण म्हणजे एआयला (AI) दिलं जाणारं प्राधान्य. मेटा आता 'एआय-नेटिव्ह' टीम्स उभारण्यावर भर देत असून, कंपनीच्या कामकाजात मोठे बदल करण्याची तयारी सुरू आहे. जवळपास ७,००० कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्यात येणार असून, सुमारे ६,००० रिक्त पदांची भरती प्रक्रिया देखील थांबवण्यात आली आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग यांनी एआय तंत्रज्ञानाला सर्वोच्च प्राधान्य दिलं असून, यावर्षी या क्षेत्रावर १२५ ते १४५ अब्ज डॉलर्स इतकी मोठी गुंतवणूक करण्याची योजना आखण्यात आली आहे. कर्मचारी कपातीच्या चर्चांना सुरुवात झाल्यापासून कंपनीतील वातावरण तणावपूर्ण झालं होतं. अनेक कर्मचारी भविष्यासंदर्भात अस्वस्थ होते. काही कर्मचाऱ्यांनी कंपनी सोडण्यापूर्वी ऑफिसमधील मोफत स्नॅक्स, चार्जर्स आणि इतर वस्तू गोळा करण्यास सुरुवात केल्याच्याही चर्चा रंगल्या. त्यातच कंपनीनं कर्मचाऱ्यांच्या माऊसच्या हालचालींवर लक्ष ठेवणारं नवीन मॉनिटरिंग टूल सुरू केल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. या पाळत ठेवण्याच्या प्रकाराला १,००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी विरोध दर्शवल्याचं समोर आलं आहे.

दरम्यान, तंत्रज्ञान क्षेत्रात सुरू असलेली कर्मचारी कपात केवळ मेटापुरती मर्यादित नसल्याचंही दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांत सिस्को सिस्टिम्सने जवळपास ४,००० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केलं. त्याचबरोबर मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन, डिस्ने आणि ओरॅकलसारख्या दिग्गज कंपन्यांनीही मोठ्या प्रमाणावर नोकरकपात केली आहे. ओरॅकलने तर जगभरातील २०,००० ते ३०,००० कर्मचाऱ्यांना पहाटे ई-मेल पाठवून सेवेतून कमी केल्याचं समो`र आलं होतं. तज्ज्ञांच्या मते, हा बदल तात्पुरता नसून तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठ्या रचनात्मक बदलांचा भाग आहे. कंपन्या आता पारंपरिक कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा एआय, ऑटोमेशन आणि जटिल डिजिटल प्रणाली हाताळू शकणाऱ्या तज्ज्ञांना अधिक प्राधान्य देत आहेत.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## विशेष



# पैठण पोलिसांचा छापा; ११ गोवंशांची सुटका, दोघांवर गुन्हा

➤ पैठण / प्रतिनिधी :
पैठण शहरातील जोहरी वॉर्ड परिसरात अवैध गोवंश कत्तल व गोमांस विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकून ११ गोवंशांची सुटका केली. यावेळी ११५ किलो गोमांस, कत्तलीसाठी वापरलेले साहित्य आणि जनावरे असा सुमारे ३ .३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी सोहेल शकील कुरेशी व अजीज सलीम कुरेशी ( रा. कुरेशी मोहल्ला ) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पैठण पोलीस करीत आहेत.

# अतिवृष्टी भरपाई, पीक विमा व कर्जमाफीसाठी किसान सभेचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांना निवेदन



माजलगाव / प्रतिनिधी :
माजलगाव, धारूर व वडवणी तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई, रब्बी अनुदान आणि कर्जमाफी मिळावी, यासाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने माजलगाव मतदारसंघाचे प्रकाश सोळंके यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात अतिवृष्टीमुळे शेती व पिकांचे मोठे नुकसान झाल्याचा उल्लेख करत प्रति हेक्टर १७,५०० रुपये पीक विमा तातडीने वितरित करावा, सुधारित पीक विमा योजना रद्द करून जुनी वैयक्तिक दावा पद्धत पुन्हा लागू करावी, रब्बी अनुदान व पशुधन भरपाई द्यावी तसेच दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी तालुका अध्यक्ष ॲड. अशोक डाके, तालुका सचिव कृष्णा सोळंके, गणेश कदम, रामभाऊ राऊत, राजेंद्र तोर, जनक तेलगड, बाळासाहेब तेलगड, अशोक राठोड व लिंबा राठोड उपस्थित होते. किसान सभेने शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली.

# नागपूर येथील राज्यस्तरीय उपवर्गीकरण चिंतन परिषदेस राजेश घोडे यांना विशेष निमंत्रण



➤ माजलगांव / प्रतिनिधी :
नागपूर येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात रविवारी ( दि. २४ ) सकाळी १० वाजता राज्यस्तरीय उपवर्गीकरण चिंतन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक, शैक्षणिक व आरक्षण विषयक विविध मुद्द्यांवर या परिषदेत सखोल चर्चा होणार असून राज्यभरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

परिषदेचे उद्घाटन माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेस आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांना विशेष निमंत्रण देण्यात आले असून ते उपवर्गीकरण, सामाजिक न्याय आणि मागास घटकांच्या हक्कांबाबत आपले विचार मांडणार आहेत. त्यामुळे परिषदेकडे राज्यभरातील सामाजिक संघटनांचे विशेष लक्ष लागले आहे.

या परिषदेत प्रा. सुकुमार कांबळे, प्रा. रामचंद्र भराडे, डॉ. अंकुश गोतावळे, प्रा. मुकेश दुपारे, डॉ. रवींद्र मुंद्रे, प्रा. किशोर बिरला, डॉ. पुरणचंद्र मेश्राम, प्रा. संदेश वाघ, रत्नसिंग बावरी, जयसिंग कुछवाह, नागेश मानकर, विशाल लारोकर, भय्याजी खैरकर तसेच लहु सेनेचे संयोजक संजय कठाळे आदी मान्यवर विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.
उपवर्गीकरणाच्या संदर्भातील सामाजिक, शैक्षणिक आणि घटनात्मक पैलूंवर चिंतन करण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. राज्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. परिषदेला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सचिन मून, संजय कठाळे, प्रशांत शहारे, राजेश भास्कर, भय्याजी खैरकर आणि प्रा. विनोद बागडे यांनी केले आहे.



# पिंपळनेर परिसरात अवैध वृक्षतोडीचा धुमाकूळ; कारवाईची मागणी

➤ बीड / विशेष प्रतिनिधी :
पिंपळनेर परिसरातील ताडसोन्ना, ईट, बाभळवाडी, वडगाव गुंधा, कुक्कडगाव, गुंजाळा, सांडरवन, लोणी शहाजानपूर, वलीपूर, आडगाव, गुंधा आणि बोरदेवी परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप होत आहे. वृक्षतोडीच्या यंत्रांच्या साहाय्याने दिवसाढवळ्या शेकडो झाडांची कत्तल होत असल्याने पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला आहे.

याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते तथा वृक्षप्रेमी भारत बडे यांनी वनविभाग आणि संबंधित यंत्रणा वृक्षतोडीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला आहे. अवैध वृक्षतोड तातडीने थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी आणि परिसरातील नागरिकांनी केली आहे.

उन्हाळ्यात वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाची गरज अधिक महत्त्वाची असताना सुरू असलेली ही वृक्षतोड चिंतेचा विषय बनली आहे. त्यामुळे वनविभागाने तत्काळ पाहणी करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शाखा स्तरावर काम वाढवा, पक्ष बळकट करा

## ➤ कन्नड मेळाव्यात उदय सामंत यांचे आवाहन



➤ कन्नड / प्रतिनिधी :
शिवसेना पदाधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने काम करत पक्षाची पायाभरणी मजबूत करावी, तसेच जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांचा सन्मान राखणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन उद्योगमंत्री तथा शिवसेना नेते उदय सामंत यांनी केले. कन्नड येथे आयोजित शिवसेना पक्ष पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते.
बीएएलए व एसआयआरच्या कामांबाबत सतर्क राहण्याचे महत्त्व अधोरेखित करत, पश्चिम बंगाल व आसाम निवडणुकांमधील घडामोडींमधून धडा घेऊन आगामी काळात शाखा आणि बीएएल पातळीवर संघटन बळकट करण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले. डीएलए कामाचा आढावा घेत त्यांनी समाधान व्यक्त केले. कन्नड तालुक्यात २०१७ मध्ये एमआयडीसी मंजूर झाल्याची माहिती देत संबंधित शेतकऱ्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.
एसआयआर संदर्भातील कामाचा आढावा घेण्यासाठी आयोजित या मेळाव्यास उदय सामंत आणि माजी खासदार राहुल शेवाळे प्रमुख उपस्थित होते. मेळाव्यात खासदार संदीपान भोपळे, आमदार अब्दुल सत्तार, आमदार रमेश बोरणारे, जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, संपर्कप्रमुख विलास पारखर, राजेंद्र राठोड, बाळासाहेब जगताप, पुष्पा गव्हाणे, प्रकाश महाजन यांची उपस्थिती होती.
यावेळी खासदार भुमरे यांनी चाळीसगाव–कन्नड घाट बोगद्याच्या मंजुरीबाबत माहिती दिली. आमदार अब्दुल सत्तार व राहुल शेवाळे यांनीही आपले विचार मांडले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर निकम यांनी केले, तर सूत्रसंचालन शिवाजी थेटे व योगेश पाटील यांनी केले.
मेळाव्यास पंचायत समिती सभापती सुप्रिया घुगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. मनोज राठोड, उपसभापती जयश बोरसे, खरेदी–विक्री संघाचे सभापती ज्ञानेश्वर निकम, उपसभापती भगवान कांदे, संचालक साईनाथ अलाड, नगरसेवक प्रकाश तीर्थानी, तालुकाप्रमुख नारायण बोडके, महिला आघाडीच्या सोनाली घाटबळे, माजी सभापती आपाराव घुगे, जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब पवार, शहर प्रमुख राम पवार, माजी नगरसेवक रत्नाकर पंडित आदींची उपस्थिती होती.

# आयुष्मान भारत योजनेचा २५ हजार रुग्णांना लाभ देण्याचे उद्दिष्ट




➤ आष्टी / प्रतिनिधी :
आष्टी, पाटोदा व शिरूर ( कासार ) तालुक्यातील सुमारे २५ हजार रुग्णांना आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती आयुष्मान भारत मिशन समितीचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश शेटे यांनी दिली.

आष्टी येथे झालेल्या आढावा बैठकीत बोलताना त्यांनी पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. योजनेअंतर्गत उपचारासाठी पाच लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध असून अनेक गंभीर आजारांचाही समावेश करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी २२ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मतदारसंघात महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती दिली. शिबिरात विविध आजारांवरील तपासणी व उपचारासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीस अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय कदम, तहसीलदार वैशाली पाटील, जिल्हा समन्वयक डॉ. गायकवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत "आर्य चाणक्य" च्या १४ विद्यार्थ्यांनी मिळविले घवघवीत यश



कु.ईश्वरी झरीकर, चि.श्रीयज पंजावाले, चि. सर्वज्ञ दहिफळे, चि. समर्थ दहिफळे, कु.ईश्वरी भिसे, कु.धनश्री भुसारे, कु. सान्वी लहासे, चि.आरव कुलकर्णी, चि.संग्राम रावस, चि. दिग्विजय गिरी, कु.अंकिता खेडकर, चि. श्री औताडे, चि. आयुष दातीर, चि. सार्थक दांडगे

➤ पैठण/ प्रतिनिधी :
शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी चा अंतरिम निकाल जाहीर झाला असून यामध्ये पैठण येथील आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिराच्या ईश्वरी रमेश झरीकर, श्रीयज जालिंदर पंजावाले, सर्वज्ञ त्र्यंबक दहिफळे, समर्थ आजिनाथ दहिफळे, ईश्वरी भाऊसाहेब भिसे, धनश्री महेश भुसारे, सान्वी बाबासाहेब लहासे, आरव स्वप्निल कुलकर्णी, संग्राम राहुल रावस, दिग्विजय शिवानंद गिरी, अंकिता प्रदीप खेडकर, श्रीगणेश औताडे, आयुष योगेश दातीर, सार्थक दिलीप दांडगे या १४ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले. या सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक प्रमोद काकडे, अर्चना गिरवलकर, मिनाक्षी पिंपळे, समृद्धी डिघुळे, शिवराज धनसुरे आदींचे विद्यामंदिराच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र आलूरकर, उपाध्यक्षा ज्योती ठाकूर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, विद्यसभा अध्यक्ष डॉ. जयंत जोशी, स्थानीय व्य .स .अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, शिवाजी मारवाडी, नंदकिशोर मालाणी, डॉ .राम लोंढे, मनोज शुक्ल, विजय चाटुपळे, किशोर भाकरे, संजय पापडीवाल, रविंद्र साळजोशी , केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, ज्योती जोशी आदींची उपस्थिती होती.

# ट्रॅक्टरवरून पडून १३ वर्षीय शाळकरी मुलाचा मृत्यू

➤ कन्नड / प्रतिनिधी :
तालुक्यातील भांबरवाडी येथे एका दुर्दैवी अपघातात १३ वर्षीय शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी ( दि. २१ ) सायंकाळी सुमारे चार वाजता घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, गौरव राहुल राठोड ( वय १३ ) हा आपल्या नातेवाईकांच्या ट्रॅक्टरवर बसून गेला होता. गावातील नाल्यातील गाळ काढून तो शेतात टाकण्याचे काम सुरू होते. यावेळी गौरव हा चालकाच्या शेजारी बसलेला असताना अचानक तोल जाऊन ट्रॅक्टरवरून खाली पडला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला.



घटनेनंतर त्याचे मामा समाधान विठ्ठल चव्हाण यांनी तातडीने त्याला उपचारासाठी कन्नड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिरुद्ध गायकवाड आणि डॉ. मनीषा मोतिंगे यांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

मृत गौरव हा गावातील शाळेत इयत्ता आठवीत शिक्षण घेत होता. या घटनेची नोंद कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार हे करत आहेत.

# नायरा पेट्रोल पंप ते जमजम पेट्रोल पंप रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असल्याने अपघातात वाढ

## नायरा पेट्रोल पंप ते जमजम पेट्रोल पंप पर्यंत सर्वीस रोड तात्काळ करण्यात यावा अन्यथा अंदोलन करु :- पप्पु गायकवाड

➤ गेवराई / प्रतिनिधी :
राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील गेवराई शहराच्या बाहेरून जाणारा झमझम पेट्रोल पंप ते नायरा पेट्रोल पंप चौक या ठिकाणी उड्डाण पुलाचे कामे चालू आहेत मात्र ती कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे एका साईडचा रस्ता बंद करून दुसऱ्या साईटचा रस्ता सुरू असून त्या रस्त्यावरून दोन्ही साईटचे वाहने येजा करत असल्या मुळे तसेच अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांतून सतत वाळू सांडत असल्यामुळे व सिग्नल कमकुवत असल्याने मोठ्या प्रमाणात अपघाताची संख्या वाढली असून मागील दोन महिन्यात १४ ते २० अपघात झाले असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.
एकाच साईडने दोन्ही साईटचे वाहने ये जा करत असल्यामुळे रुग्णवाहिकेला देखील खूप त्रास होत आहे तसेच रुग्णवाहिकेला रुग्ण नेताना अडचणी निर्माण होत असल्यामुळे रुग्णांचे देखील प्राण गमावले आहेत.



नायरा पेट्रोल पंप ते जमजम पेट्रोल पंप हा रस्ता जलद गतीने तात्काळ तयार करण्यात यावा तसेच रस्ता होईपर्यंत सर्विस रोड तात्काळ सुरु करण्यात यावे अन्यथा दि. ९ जुन रोजी लोकशाही मार्गाने प्रवाशांसह वंचित बहुजन आघाडीच्यावतिने जमजम पेट्रोल पंप चौक व नायरा पेट्रोल पंप चौक या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करु असा लेखी निवेदनाद्वारे केलेल्या मागणीमध्ये वंचित बहुजन आघाडी मा .तालुका अध्यक्ष अजयकुमार ( पप्पू ) गायकवाड यांनी उपमहाव्यवस्थापक तथा प्रकल्प संचालक भारतीय राज्यमार्ग प्रधिकरण यांच्या सह मा .जिल्हाधिकारी, मा .पोलीस अधीक्षक, मा .पोलिस निरीक्षक गेवराई यांना इशारा दिला आहे.